## आजचे पंचांग

दिनांक : ८ जुलै २०२६ वार : बुधवार माह (अमावस्यांत) : ज्येष्ठ माह (पूर्णिमांत) : आषाढ ऋतु : वर्षा आयन : दक्षिणायन पक्ष : कृष्ण पक्ष तिथी : अष्टमी तिथी (दुपारी १२:२१ पर्यंत) त्यानंतर नवमी तिथी नक्षत्र : रेवती नक्षत्र (दुपारी ०३:५९ पर्यंत) त्यानंतर अश्विनी नक्षत्र योग : अतिगण्ड योग (दुपारी १२:३७ पर्यंत) त्यानंतर सुकर्मा योग करण : कौलव करण (दुपारी १२:२१ पर्यंत)

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


## वायनाड भूस्खलनात तिघांचा मृत्यू, ७ बेपत्ता

**कार्ला (मावळ) :** केरळमध्ये खासदार प्रियांका गांधी यांच्या वायनाड मतदारसंघात भूस्खलनाची भयावह घटना घडली आहे. मेप्पाडीजवळील कल्लाडी येथे अचानक भूस्खलन झाल्याने (दरड कोसळल्याने) तीन जणांचा मृत्यू झाला तर ७ जण बेपत्ता असल्याचे समजते. ही दुर्घटना वायनाड बोगदा प्रकल्प परिसरात घडली. दुर्घटनेची सीसीटीव्ही फुटेजही आता समोर आले आहे.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | बुधवार, दि. ८ जुलै २०२६ | वर्ष - १ | अंक - २८१ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### सर्वोच्च न्यायालय : बँका वकिलांना काळ्या यादीत टाकू शकत नाहीत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**दिल्ली :** केवळ व्यावसायिक निष्काळजीपणाच्या आरोपावरून बँका किंवा इंडियन बँक्स असोसिएशन (आयबीए) वकिलांना काळ्या यादीत टाकू शकत नाहीत, असा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. न्यायमूर्ती पी. एस. नरसिंह आणि आलोक आराधे यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, वकिलांवरील गैरवर्तन किंवा निष्काळजीपणाच्या तक्रारींवर कारवाई करण्याचा अधिकार बार कौन्सिलकडे आहे. त्यामुळे बँकांनी संबंधित वकिलाचे नाव सावधगिरीच्या यादीतून तात्काळ हटवावे, असे निर्देश न्यायालयाने दिले. मात्र, कायदेशीर मतांची गुणवत्ता आणि वकिलांच्या व्यावसायिक जबाबदारीबाबतच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करता येणार नसल्याचे सांगत न्यायालयाने बार कौन्सिल ऑफ इंडियाला शिस्तभंग यंत्रणेचे मूल्यांकन करण्यासाठी समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले.

### शरद पवारांची राष्ट्रवादी भाजपाबरोबर जाणार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या पुन्हा एकदा मोठ्या उलथापालथीच्या चर्चांना उधाण आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील आणि भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांच्यात मुंबईत बैठक झाल्याच्या बातम्या समोर आल्यानंतर राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. शरद पवारांचा पक्ष भाजपसोबत जाणार का, अशी चर्चा रंगली असतानाच, देवेंद्र फडणवीस यांनी दिल्लीतून या चर्चांवर महत्त्वाचे विधान केले आहे. महाराष्ट्रातून राष्ट्रीय लोकशाही आघाडीत किंवा राज्यातील महायुतीत सध्या कोणताही नवीन पक्ष येणार नाही. पक्षाच्या विस्तारासाठी किंवा आगामी निवडणुकांसाठी कोणाचाही पक्ष फोडण्याचा आमचा कोणताही हेतू नाही.

# १३८ जलदगती न्यायालये न्यायाधीशांविना रखडली; उच्च न्यायालयाकडे पाठपुरावा सुरू असल्याची मुख्यमंत्र्यांची माहिती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्यात मंजूर करण्यात आलेल्या १३८ जलदगती न्यायालयांचे कामकाज न्यायाधीशांच्या नियुक्तीअभावी पूर्ण क्षमतेने सुरू होऊ शकलेले नसल्याचे समोर आले आहे. या न्यायालयांसाठी आवश्यक न्यायाधीश उपलब्ध करून देण्यासाठी उच्च न्यायालयाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली. मात्र, न्यायाधीशांच्या रिक्त पदांमुळे जलद न्याय देण्याच्या उद्देशालाच फटका बसत असल्याची बाब यानिमित्ताने पुन्हा अधोरेखित झाली.

राज्यातील प्रलंबित खटल्यांचा वाढता बोजा कमी करण्यासाठी तसेच महिला, बालकांवरील अत्याचार आणि इतर गंभीर गुन्ह्यांशी संबंधित प्रकरणांचा जलद निपटारा करण्याच्या उद्देशाने जलदगती न्यायालये मंजूर करण्यात आली आहेत. मात्र, न्यायाधीशांची उपलब्धता न झाल्याने अनेक न्यायालये अपेक्षित गतीने कार्यरत होऊ शकलेली नाहीत.




याबाबत सभागृहात उपस्थित झालेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी न्यायाधीशांची नियुक्ती ही उच्च न्यायालयाच्या प्रशासकीय प्रक्रियेशी संबंधित बाब असल्याचे स्पष्ट केले. आवश्यक न्यायाधीश उपलब्ध व्हावेत यासाठी राज्य शासन सातत्याने पाठपुरावा करत असून, न्यायालये कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा आणि निधी उपलब्ध करून देण्याची तयारी शासनाने दर्शविली असल्याचे त्यांनी सांगितले.

तथापि, न्यायालये मंजूर होऊनही न्यायाधीशांच्या रिक्त पदांमुळे त्यांचा अपेक्षित लाभ नागरिकांना मिळत नसल्याची वस्तुस्थिती कायम आहे. त्यामुळे प्रलंबित खटल्यांची संख्या कमी होण्याऐवजी न्यायप्रक्रियेला विलंब होत असल्याची टीका कायदेतज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे.


जलद न्यायव्यवस्था उभारण्याच्या घोषणांनंतरही प्रत्यक्षात न्यायाधीशांची कमतरता हा मोठा अडथळा ठरत असून, रिक्त पदे तातडीने भरून मंजूर न्यायालये पूर्ण क्षमतेने सुरू करण्याची मागणी पुन्हा एकदा पुढे आली आहे.

## एमपीएससीमुळे पुन्हा सेट परीक्षा लांबली; विद्यार्थ्यांच्या नियोजनाचा बोजवारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) परीक्षा आणि आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर २६ जुलै रोजी होणारी राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट) संभाव्यतः ६ सप्टेंबरपर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे. या निर्णयामुळे सहाय्यक प्राध्यापक होऊ इच्छिणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांची प्रतीक्षा आणखी वाढली असून, परीक्षा नियोजनाबाबत संबंधित यंत्रणांवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत महाराष्ट्र आणि गोव्यात आयोजित होणारी ४१ वी सेट परीक्षा मूळतः २६ जुलैला होणार होती. मात्र, त्याच दिवशी एमपीएससीच्या विविध विषयांच्या सरळसेवा भरतीच्या परीक्षा असल्याने विद्यार्थ्यांना एका परीक्षेची निवड करावी लागली असती. याशिवाय ७ ते २५ जुलैदरम्यानच्या आषाढी वारीमुळे वाहतूक आणि परीक्षा व्यवस्थापनावरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली.



विद्यार्थ्यांकडून आलेल्या निवेदनांचा दाखला देत विद्यापीठाच्या सेट विभागाने परीक्षा ६ सप्टेंबरला घेण्याची संभाव्य तारीख जाहीर केली आहे. मात्र, अंतिम वेळापत्रक पुढील १५ दिवसांत प्रसिद्ध करण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांमध्ये अद्यापही अनिश्चिततेचे वातावरण कायम आहे.

वारंवार बदलणाऱ्या परीक्षा तारखा, समन्वयाचा अभाव आणि शेवटच्या क्षणी घेतले जाणारे निर्णय यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचे नियोजन विस्कळीत होत असल्याची टीका होत आहे. स्पर्धा परीक्षांचे वेळापत्रक ठरवताना विविध परीक्षा घेणाऱ्या संस्थांमध्ये अधिक प्रभावी समन्वयाची गरज असल्याचे मत विद्यार्थी आणि शिक्षण क्षेत्रातून व्यक्त केले जात आहे.

## जळगाव जामोद बेपत्ता महिला प्रकरण : चुकीच्या तपासावर सरकारची कारवाई; तीन महिन्यांत विभागीय चौकशीचे आदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** जळगाव जामोद येथील बेपत्ता महिलेच्या प्रकरणात पोलिसांकडून झालेल्या गंभीर तपासातील त्रुटींवर राज्य सरकारने कठोर कारवाईचा इशारा दिला आहे. या प्रकरणाची विभागीय चौकशी तीन महिन्यांत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले असून, दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांवर निलंबनासोबतच सेवेतून निष्कासनाची कारवाई करण्याची प्रक्रिया राबवली जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली.

विधानसभेतील प्रश्नोत्तराच्या तासात आमदार रोहित पवार यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी पोलिसांच्या तपास पद्धतीवर गंभीर नाराजी व्यक्त केली. बेपत्ता महिलेच्या प्रकरणात पोलिसांनी प्राथमिक तपासातच घाईघाईने निष्कर्ष काढल्याचे आणि वैज्ञानिक पडताळणी न करता प्रकरण निकाली काढण्याचा प्रयत्न केल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकरणातील सर्वात गंभीर बाब म्हणजे, एका मृतदेहाची ओळख संबंधित बेपत्ता महिलेचा मृतदेह म्हणून करण्यात आली. त्यानंतर कोणतीही ठोस वैज्ञानिक खातरजमा न करता महिलेच्या आई-वडिलांनाच तिच्या हत्येच्या आरोपाखाली अटक करण्यात आली. मात्र, काही काळानंतर संबंधित महिला जिवंत असल्याचे स्पष्ट झाले आणि ती स्वतः पोलीस ठाण्यात हजर झाली. त्यामुळे पोलिसांना तिच्या आई-वडिलांची सुटका करावी लागली.

या संपूर्ण घटनाक्रमामुळे तपास यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मृतदेहाची ओळख पटविण्यापासून ते आरोपी निश्चित करण्यापर्यंत पोलिसांनी कोणत्या आधारावर निर्णय घेतले, याची चौकशी आता विभागीय स्तरावर केली जाणार आहे. मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, या प्रकरणातील गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक आणि संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. मात्र, निलंबन ही केवळ प्राथमिक कारवाई असून, चौकशीत दोष सिद्ध झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांना सेवेतून कमी करण्याची प्रक्रिया पूर्ण केली जाईल. तसेच आवश्यकतेनुसार फौजदारी कारवाईही करण्यात येणार आहे. दरम्यान, या प्रकरणाचा तपास अधिक प्रभावी करण्यासाठी राज्य सरकारच्या कृत्रिम बुद्धिमत्ता (अख) तंत्रज्ञानाचाही वापर करण्यात येत आहे. राज्यातील सुमारे १,६०० ते १,७०० बेपत्ता व्यक्तींच्या प्रकरणांचे विश्लेषण या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून करण्यात आले असून, त्यातून सात मृतदेहांची ओळख पटवण्यात यश आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. मात्र, जळगाव जामोद प्रकरणाने पोलिस तपासातील निष्काळजीपणा, वैज्ञानिक पुराव्यांचा अपुरा वापर आणि निष्कर्षापूर्वीच तपास पूर्ण करण्याची घाई यासारख्या गंभीर मुद्द्यांना पुन्हा अधोरेखित केले आहे. चुकीच्या तपासामुळे एका कुटुंबाला मानसिक आणि सामाजिक त्रास सहन करावा लागला असून, सरकारने संबंधित पीडित कुटुंबाला आर्थिक मदत देण्याची घोषणाही केली आहे. आता या प्रकरणातील विभागीय चौकशीचा अहवाल तीन महिन्यांत येणे अपेक्षित असून, दोषींवर प्रत्यक्षात किती कठोर कारवाई होते, याकडे लक्ष लागले आहे.

## संत तुकाराम महाराज पालखी प्रस्थान सोहळा उत्साहात; आळंदीऐवजी अनेक दिंड्या पुण्यात दाखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या पालखी प्रस्थान सोहळ्याला उत्साहात सुरुवात झाली. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी उपस्थित राहून संत तुकाराम महाराजांच्या पादुकांचे दर्शन घेतले आणि वारकऱ्यांना आषाढी वारीच्या शुभेच्छा दिल्या.




वारी ही महाराष्ट्राच्या संस्कृती, भक्ती आणि सामाजिक ऐक्याची परंपरा असल्याचे त्यांनी सांगितले. प्रशासनाकडून वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसह आवश्यक सुविधांची व्यवस्था करण्यात आल्याची माहितीही त्यांनी घेतली.

दरम्यान, आळंदीत झालेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर गर्दी टाळण्याच्या आवाहनाला दिंडी प्रमुखांनी प्रतिसाद दिला आहे.

अनेक दिंड्यांनी नियोजनात बदल करत थेट पुण्याकडे मुक्काम हलवला आहे. काही दिंड्या आळंदीबाहेरील सुरक्षित ठिकाणी थांबून पालखी सोहळ्यात सहभागी होणार आहेत.

## पुण्यात खासगी कंपनीची बस पाण्यात अडकली; कर्मचाऱ्यांची अग्निशमन दलाकडून सुटका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** खासगी कंपनीची बस साचलेल्या पाण्यात अडकल्याची घटना वाघोली-लोहगाव रस्त्यावर मंगळवारी सकाळी घडली. अग्निशमन दलाच्या जवानांनी पाण्यात अडकलेल्या बसमधील सहा कर्मचाऱ्यांची सुटका केली. अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे गंभीर दुर्घटना टळली.

शहर परिसरात संततधार पाऊस सुरू आहे. मंगळवारी सकाळी झालेल्या मुसळधार पावसामुळे लोहगाव-वाघोली रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर साचले होते. पावसामुळे पाण्याच्या पातळीत अचानक वाढ झाली. त्या वेळी लोहगाव-वाघोली रस्त्यावरुन निघालेल्या बस चालकाने पाण्यात बस नेली. पाण्यात बस अडकली. पाण्यातून मार्ग काढता न आल्याने बस चालक गोंधळला. बसमधील कर्मचारी घाबरले. रस्त्यावर साधारणपणे चार ते पाच फूट पाणी साचल्याने बस चालकासह कर्मचाऱ्यांना बसमधून बाहेर पडता येणे शक्य नव्हते. या घटनेची माहिती अग्निशमन दलाला कळविण्यात आली. पुणे महापालिका, तसेच पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) अग्निशमन दलातील जवानांनी घटनास्थळी धाव घेतली. जवानांनी प्रसंगावधान राखून पाण्यात अडकलेल्या बस चालकासह कर्मचाऱ्यांना दोराचा वापर करून बाहेर काढले.

## लाडक्या बहिणींना २,१०० रुपयांचे आश्वासन; 'मोफत वाटप' की सामाजिक सुरक्षेची गरज?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महाराष्ट्रातील 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेतील मासिक आर्थिक मदत १,५०० रुपयांवरून २,१०० रुपये करण्याचे आश्वासन पुन्हा चर्चेत आले आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुती सरकारने दिलेल्या या आश्वासनाची अद्याप अंमलबजावणी झालेली नसली, तरी केंद्राच्या एका अहवालातील शिफारशींमुळे या योजनेच्या भवितव्यावर चर्चा सुरू झाली आहे.

मात्र, या योजनेभोवतीचा मुख्य प्रश्न केवळ मदत वाढवण्याचा नाही, तर सरकारकडून थेट रोख रक्कम वाटप करण्याच्या धोरणाचा आहे. गरजू महिलांना आर्थिक आधार देणे हा उद्देश असला, तरी अशा योजनांचा दीर्घकालीन आर्थिक परिणाम, राज्याच्या तिजोरीवरील भार आणि त्यातून निर्माण होणारी अवलंबित्वाची शक्यता यावरही प्रश्न उपस्थित होत आहेत.

महायुती सरकारने निवडणुकीच्या काळात महिलांना दरमहा २,१०० रुपये देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, यासाठी आवश्यक निधी, अंमलबजावणीची तारीख आणि आर्थिक नियोजन याबाबत अद्याप स्पष्टता नाही. निवडणुकीपूर्वी जाहीर केलेल्या लोकप्रिय योजनांची अंमलबजावणी करताना सरकारसमोर आर्थिक शिस्त राखण्याचे आव्हान कायम असते.

पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेच्या अहवालात थेट आर्थिक मदत देणाऱ्या योजनांचा आढावा घेण्यात आला आहे. महागाई आणि वाढत्या जीवनावश्यक खर्चाच्या पार्श्वभूमीवर अशा योजनांच्या मदतीचा वेळोवेळी पुनर्विचार करण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे.

मात्र, अहवालात केवळ रोख मदत वाढवण्यावर भर नसून महिलांना कौशल्य विकास, डिजिटल साक्षरता आणि स्वयं-सहाय्यता गटांशी जोडण्यावरही भर देण्यात आला आहे.

थेट आर्थिक मदतीच्या योजनांचा सर्वात मोठा फायदा म्हणजे तातडीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी महिलांच्या



हातात पैसा उपलब्ध होतो. आरोग्य, शिक्षण, घरगुती खर्च आणि दैनंदिन गरजांसाठी या पैशाचा वापर होत असल्याचे अभ्यासातून समोर आले आहे. महिलांच्या बँक खात्यातील बचत वाढणे आणि आर्थिक निर्णयांमध्ये त्यांचा सहभाग वाढणे हे या योजनांचे सकारात्मक परिणाम मानले जात आहेत.

मात्र, दुसरी बाजूही तितकीच महत्त्वाची आहे. राज्याच्या अर्थसंकल्पातील मोठा हिस्सा अशा योजनांसाठी खर्च होत असल्यास पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य आणि रोजगारनिर्मिती यांसारख्या दीर्घकालीन क्षेत्रांवर त्याचा परिणाम होऊ शकतो. केवळ पैसे वाटप करून महिलांचे आर्थिक सक्षमीकरण शक्य आहे का, हा प्रश्न धोरणकर्त्यांसमोर आहे.

योजनेतील लाभार्थींच्या पडताळणीनंतर मोठ्या संख्येने महिला अपात्र ठरल्याने पात्रता निकष, पारदर्शकता आणि अंमलबजावणी व्यवस्थेवरही चर्चा सुरू झाली आहे. सरकारी मदत खऱ्या गरजूंपर्यंत पोहोचणे आवश्यक असताना राजकीय फायद्यासाठी योजनांचा वापर होऊ नये, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

लोककल्याणकारी योजना ही सरकारची जबाबदारी असली, तरी त्यांचा उद्देश केवळ मतदारांना आकर्षित करणे नसून नागरिकांना स्वावलंबी बनवणे असायला हवा. महिलांच्या हातात थेट आर्थिक मदत देण्यासोबतच रोजगार, उद्योग, कौशल्य आणि आर्थिक स्वातंत्र्याच्या संधी निर्माण झाल्या, तरच अशा योजनांचा खरा परिणाम दिसून येईल.

लाडकी बहीण' योजनेतील २,१०० रुपयांचा निर्णय सरकार कधी घेणार, यापेक्षा महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, ही मदत महिलांना किती काळासाठी आधार देईल आणि त्यांना अधिक सक्षम बनवण्यासाठी पुढील पाऊल काय असेल.

## संपादकीय

### आधी प्रयोग, मग अभ्यास जनता आहेच ना 'टेस्ट ड्राइव्ह'साठी?

भारताने गेल्या काही वर्षांत ऊर्जा स्वावलंबनाचे मोठे स्वप्न देशासमोर ठेवले आहे. कच्च्या तेलावरील आयातीचे अवलंबित्व कमी करणे, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, कार्बन उत्सर्जन कमी करणे आणि देशांतर्गत इंधन उत्पादनाला चालना देणेया सर्व उद्दिष्टांसाठी E20 पेट्रोल म्हणजेच २० टक्के इथेनॉल मिश्रित पेट्रोल हे सरकारचे महत्त्वाचे धोरण बनले. कागदावर हे धोरण आकर्षक वाटते. परंतु प्रत्येक चांगल्या कल्पनेचे यश तिच्या अंमलबजावणीवर अवलंबून असते. आणि याच ठिकाणी E20 धोरण अनेक प्रश्न निर्माण करत आहे.

धोरणाची घोषणा करणे सोपे असते, पण त्यासाठी देशातील नागरिक, वाहन उद्योग, इंधन वितरण व्यवस्था आणि शेती क्षेत्र तयार आहे का, हा मूलभूत प्रश्न विचारला गेला का? भारतात अजूनही लाखो वाहने अशी आहेत जी E20 साठी पूर्णपणे सुसंगत नाहीत. अनेक वाहन उत्पादकांनी जुन्या मॉडेल्सबाबत सावधगिरी बाळगण्याचा सल्ला दिला आहे. काही ग्राहकांनी मायलेज कमी होणे, इंजिनच्या कार्यक्षमतेबाबत शंका आणि देखभाल खर्च वाढण्याच्या तक्रारी मांडल्या आहेत. या अनुभवांचा वैज्ञानिक आणि पारदर्शक अभ्यास करून त्याचे निष्कर्ष सार्वजनिक करण्याऐवजी सरकारकडून प्रामुख्याने यशाचीच बाजू मांडली जाते, अशी टीका विरोधक आणि काही तज्ज्ञ करत आहेत.

याच काळात भूतानने भारताच्या E20 प्रस्तावाचा स्वीकार केलेला नाही. अर्थात, हा निर्णय भारताच्या धोरणावरील अंतिम शिक्का नाही. भूतानचे वाहन बाजारपेठेचे स्वरूप, ऊर्जा धोरण आणि स्थानिक परिस्थिती भारतापेक्षा वेगळी आहे. तरीही एक प्रश्न उभा राहतोजर एखादा शेजारी देश आपल्या परिस्थितीचा विचार करून थांबू शकतो, तर भारतातील नागरिकांनाही या धोरणाबाबत प्रश्न विचारण्याचा अधिकार नाही का? लोकशाहीत धोरणावर प्रश्न विचारणे म्हणजे विकासाला विरोध नव्हे; तर विकास अधिक जबाबदार करण्याचा प्रयत्न असतो.

सरकारचा दावा आहे की इथेनॉलमुळे तेल आयात कमी होईल आणि शेतकऱ्यांना फायदा होईल. हे उद्दिष्ट नक्कीच स्वागतार्ह आहे. पण त्यासाठी ऊस आणि धान्याचा वाढता वापर, पाण्यावरील ताण, शेतीच्या बदलत्या पद्धती आणि अन्नसुरक्षेवर होणाऱ्या संभाव्य परिणामांकडे दुर्लक्ष करता येणार नाही. महाराष्ट्रासारख्या राज्यांमध्ये वारंवार दुष्काळ, भूजल पातळीतील घट आणि पाण्याचे असमान वितरण ही वास्तवातील आव्हाने आहेत. अशा परिस्थितीत पाणीखाऊ पिकांवर आधारित इंधन धोरण दीर्घकालीन दृष्टीने टिकाऊ आहे का, हा प्रश्न विचारणे आवश्यक आहे.

याहून महत्त्वाचा मुद्दा म्हणजे नागरिकांचा विश्वास. कोणतेही राष्ट्रीय धोरण तेव्हाच यशस्वी होते, जेव्हा नागरिकांना त्याची कारणे, फायदे, मर्यादा आणि संभाव्य धोके स्पष्टपणे सांगितले जातात. जर नागरिकांच्या शंका केवळ विरोध म्हणून बाजूला सारल्या गेल्या, तर विश्वासाऐवजी संशय निर्माण होतो. विज्ञानाचा आधार घेतलेले धोरण लोकांसमोर विज्ञानाच्या भाषेतच मांडले गेले पाहिजे.

ऊर्जा स्वावलंबन ही भारताची गरज आहे. परंतु स्वावलंबनाचा मार्ग नागरिकांच्या सहभागातून आणि पारदर्शकतेतून जावा की फक्त प्रशासकीय आदेशांतून? हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. देशाला हरित ऊर्जा हवीच; पण ती नागरिकांचा विश्वास गमावून मिळणार असेल, तर ते यश अपुरे ठरेल.

E20 हे यशस्वी ठरेल की नाही, याचा अंतिम निर्णय इतिहास देईल. मात्र आजचा धडा स्पष्ट आहेकोणतेही मोठे धोरण राबवताना सरकारने केवळ आकडेवारी नव्हे, तर नागरिकांचा अनुभव, तज्ज्ञांचे मत, पर्यावरणीय परिणाम आणि उद्योगांची तयारी यांचाही तितक्याच गांभीर्याने विचार करायला हवा. अन्यथा ऊर्जा स्वावलंबनाचे स्वप्न हे लोकांच्या मनात विश्वासाऐवजी प्रश्न निर्माण करणारे ठरेल.

लोकशाहीत सरकारला धोरण राबवण्याचा अधिकार असतो; पण नागरिकांना त्या धोरणावर प्रश्न विचारण्याचा अधिकार तितकाच मूलभूत असतो. E20 च्या चर्चेने हा लोकशाहीचा धडा पुन्हा एकदा अधोरेखित केला आहे.

# संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यात प्रथमच महापालिकेचा 'साक्षरतेची वारी' चित्ररथ

## आकुर्डी ते पंढरपूर मार्गावर वारकऱ्यांमध्ये साक्षरतेचा संदेश; शिक्षण विभागाचे १० कर्मचारी अभियानात सहभागी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** केंद्र शासनाच्या 'उल्लास-नवभारत साक्षरता कार्यक्रम' अंतर्गत पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने यंदा प्रथमच जगद्गुरू संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यात महापालिकेच्या शिक्षण विभागाचा 'साक्षरतेची वारी, शिक्षणाचा संदेश' हा जनजागृतीपर चित्ररथ सहभागी होत आहे. आकुर्डी ते पंढरपूर या पालखी मार्गावर हा चित्ररथ वारकऱ्यांमध्ये साक्षरता आणि शिक्षणाचे महत्त्व पोहोचविणार आहे. तसेच शिक्षण विभागाचे १० कर्मचारी संपूर्ण पालखी सोहळ्यात सहभागी होऊन साक्षरता अभियान राबविणार आहेत.



या चित्ररथाचे उद्घाटन महापौर रवि लांडगे आणि महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते वसंतदादा पाटील विद्यामंदिर येथे करण्यात आले. यावेळी उपायुक्त ममता शिंदे, प्रशासन अधिकारी संगीता बांगर, विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड, महाराष्ट्र राज्य शिक्षण संचालनालयाचे कृष्णकुमार पाटील, उपसंचालक वंदना वावळ, गणपत मोरे, सहाय्यक संचालक सतीश चौधरी, शिक्षण उपनिरीक्षक रमेश चव्हाण यांच्यासह शिक्षण विभागाचे अधिकारी, शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी बोलताना महापौर रवि लांडगे म्हणाले, संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यासारख्या लोकआस्थेच्या माध्यमातून साक्षरतेचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचा हा अभिनव उपक्रम आहे. 'साक्षरतेची वारी, शिक्षणाचा संदेश' या चित्ररथातून शिक्षणाचे महत्त्व आणि निरक्षरता निर्मूलनाचा संदेश प्रभावीपणे पोहोचेल.

प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी मिळावी आणि आर्थिक अडचणींमुळे कोणीही शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी महापालिका कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. 'अक्षर विश्व' उपक्रमाच्या माध्यमातून पिंपरी-चिंचवड शहर शंभर टक्के साक्षर करण्याचा संकल्प असून, महापालिकेच्या १३५ शाळांमधून विद्यार्थ्यांना राष्ट्रीय दर्जाचे शिक्षण देण्याचा प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# पिंपरी चिंचवडमध्ये पहिल्याच मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत; नवनियुक्त आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्यासमोर मोठे आव्हान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी चिंचवड :** शहरात झालेल्या पहिल्याच मुसळधार पावसानंतर अनेक भागांमध्ये पाणी साचल्याने जनजीवन विस्कळीत झाले. सखल भाग, रस्ते आणि काही गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला असून घरगुती वस्तू, दुकाने आणि वाहनांचे नुकसान झाल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत.



या पार्श्वभूमीवर शहरातील पावसाळी पूर्वतयारी, नालेसफाई आणि जलनिस्सारण व्यवस्थेच्या कार्यक्षमतेबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. स्थानिक वृत्तपत्रांमधूनही महापालिकेच्या नियोजनावर टीका करण्यात आली असून, पूरस्थितीमागील कारणांची सखोल चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्याची मागणी करण्यात आली आहे.

माजी आयुक्तांच्या बदलीनंतर नुकतेच मुख्य आयुक्त म्हणून पदभार स्वीकारलेल्या डॉ. विजय सूर्यवंशी यांच्यासमोर शहरातील पूरस्थिती हाताळणे, प्रभावित भागांची पाहणी करणे आणि आवश्यक प्रशासकीय उपाययोजना राबविण्याचे महत्त्वाचे आव्हान उभे राहिले आहे.

नागरिकांनी वारंवार उद्भवणाऱ्या पाणी तुंबण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना, जलनिस्सारण व्यवस्थेचे पुनरावलोकन तसेच संबंधित कामांची चौकशी करून आवश्यक ती कारवाई करण्याची मागणी केली आहे.

# तळेगाव-चाकण-शिक्रापूर मार्गावरील 'हा' पूल वाहतुकीसाठी बंद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** अतिवृष्टीमुळे तळेगाव-चाकण-शिक्रापूर मार्गावरील म्हाळुंगे पोलीस ठाण्याजवळील जुन्या पुलाचा भराव खचल्याने हा पूल वाहतुकीस धोकादायक बनला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सुचनेनुसार पिंपरी-चिंचवड वाहतूक शाखेने या पुलावरील सर्व प्रकारच्या वाहनांची वाहतूक १४ जुलैपर्यंत बंद ठेवण्यात येणार आहे.

पोलीस उपायुक्त विक्रांत देशमुख यांनी ही अधिसूचना जारी केली आहे. चाकण, तळवडे व महिंद्राकडे जाणाऱ्या वाहनांसाठी एच.पी. चौक, इंड्युरन्स चौक, सिग्मा, व्ही.डब्ल्यू. कॉर्नर, एआर-एआय चौक, स्पायसर चौक तसेच महिंद्रा सर्कल मार्गे पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे.

तसेच चाकणहून येणाऱ्या वाहनांसाठी वाघजाईनगर, बिरदवाडी चौक आणि म्हाळुंगे गाव कमान-आंबेठाण मार्ग उपलब्ध करून देण्यात आला आहे. वाहनचालकांनी सहकार्य करून पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन वाहतूक पोलिसांनी केले आहे.

# पोलीस आयुक्तांच्या आदेशाला केराची टोपली! काळेवाडीत 'कोयता' घेऊन फिरणारा भाई जेरबंद; गुन्हे शाखा युनिट-२ ची कडक कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**काळेवाडी :** पिंपरी-चिंचवड शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस आयुक्तांनी कडक शस्त्रबंदी लागू केली असतानाही, या आदेशाला पायदळी तुडवून हातात धारदार कोयता बाळगणाऱ्या एका २० वर्षीय गुंडाला गुन्हे शाखेने बेड्या ठोकल्या आहेत. काळेवाडी स्मशानभूमीजवळ गुन्हे शाखा युनिट-२ च्या पथकाने ही धडक कारवाई केली.

अटक केलेल्या आरोपीचे नाव:

समिर शराफत उस्मानी (वय २० वर्षे, रा. चांदणी चौक, जगतापनगरजवळ, थेरगाव, पुणे)

पोलीस आयुक्तांचे आदेश झुगारले; गंभीर गुन्ह्याचा होता डाव!

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१)(३) अन्वये २४ जून २०२३ रोजी मध्यरात्री ००:०१ वाजेपासून ते ७ जुलै २०२६ रोजी रात्री २४:०० वाजेपर्यंत (१४ दिवसांसाठी) विशेष प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. या काळात लाठ्या-काठ्या, तलवारी, बंदुका, चाकू आणि कोयते यांसारखी घातक शस्त्रे सोबत बाळगण्यास सक्त मनाई आहे.

असे कडक आदेश लागू असतानाही, आरोपी समिर उस्मानी हा ६ जुलै २०२६ रोजी दुपारी ४:३० वाजण्याच्या सुमारास काळेवाडी स्मशानभूमीजवळ संशयास्पद रित्या फिरत होता. गुन्हे शाखेच्या पथकाने त्याला ताब्यात घेऊन त्याची झडती घेतली असता, त्याच्या कब्जात एक धारदार लोखंडी कोयता मिळून आला. प्राथमिक तपासानुसार, परिसरात एखादा गंभीर स्वरूपाचा गुन्हा करण्याच्या किंवा दहशत माजवण्याच्या उद्देशानेच तो हे घातक हत्यार घेऊन फिरत होता.

काळेवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

शस्त्रबंदी आदेशाचे उल्लंघन करून बेकायदेशीरपणे घातक हत्यार बाळगल्याप्रकरणी गुन्हे शाखा युनिट-२ चे पोलीस हवालदार तुषार अशोक शेटे (नेमणूक- गुन्हे शाखा, युनिट-२, पिंपरी-चिंचवड) यांनी फिर्याद दिली आहे.

त्यांच्या तक्रारीवरून आरोपी समिर उस्मानी विरुद्ध काळेवाडी पोलीस ठाण्यात भारतीय शस्त्र अधिनियम (आर्म्स ॲक्ट) १९५९ चे कलम ४ (२५) व महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) सह १३५ नुसार कडक गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. पोलीस उपनिरीक्षक (पोउनि) नाईकनिंबाळकर या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# मोशीत मध्यरात्री थरार! शटर उचकटून दुकाने साफ करणारी टोळी गजाआड; एमआयडीसी भोसरी पोलिसांची कडक कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मोशी :** मध्यरात्रीच्या शांततेचा फायदा घेऊन दुकानांची शटर उचकटून हातसाफ करणाऱ्या एका अट्टल टोळी गजाआड करण्यात एमआयडीसी भोसरी पोलिसांना यश आले आहे. मोशी येथील बोराडेवाडी परिसरात लागोपाठ दोन दुकाने फोडून रोख रक्कम पळवणाऱ्या ३ सराईत चोरट्यांना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.

अटक केलेले आरोपी (वय वर्षे १९):

१. विश्वजीत बाळासाहेब जाधव (वय १९, रा. रेल्वे गेटजवळ, गवळी यांचे घरी भाड्याने, शिवाजीनगर, पुणे)

२. विवेक विनोद राम (वय १९, रा. गायकवाड यांचे घर, वॉर्ड नंबर ३, दापोडी, पुणे)




३. यश पवार (रा. शिवाजीनगर, पुणे - पूर्ण पत्ता माहीत नाही)

लोखंडी हत्याराने शटर उचकटले; अशी घडली घटना

६ जुलै २०२६ रोजी मध्यरात्री २:०० ते ३:०० च्या सुमारास बोराडेवाडी येथील मुख्य रस्ता (मंत्रा मूव्हमेंट रोड) परिसरात ही घटना घडली. आरोपी विश्वजीत जाधव, विवेक राम आणि यश पवार यांनी पूर्वनियोजित कट रचून बोराडेवाडी येथील 'ऋद्धी सिद्धी ट्रेडिंग कंपनी' आणि 'कृष्णाई दूध डेअरी' या दोन व्यापारी प्रतिष्ठानांना लक्ष्य केले.

चोरट्यांनी लोखंडी हत्याराचा (टायर लिव्हर किंवा तत्सम कठीण वस्तू) वापर करून दोन्ही दुकानांची शटर ताकदीने उचकटली. दुकानात बेकायदेशीर रित्या प्रवेश करून त्यांनी काउंटरच्या ड्रॉवरमध्ये ठेवलेली एकूण ४१,००० रुपये रोख रक्कम चोरून पळ काढला होता.

एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

याप्रकरणी व्यावसायिक फिर्यादी प्रदीप सुरेश शेळके (वय ५२, धंदा- किराणा दुकान, रा. स्वप्नपूर्ती हाऊसिंग सोसायटी, बोराडेवाडी, मोशी) यांनी पोलिसांत रीतसर तक्रार दाखल केली.

व्यापाऱ्यांच्या तक्रारीवरून एमआयडीसी भोसरी पोलिसांनी तात्काळ पावले उचलत आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ३०५, ३३१(४) आणि ३(५) अंतर्गत गंभीर गुन्ह्यांची नोंद केली असून आरोपींना जेरबंद केले आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास सहायक पोलीस फौजदार झरे अत्यंत कडक रितीने करत आहेत.

# हिंजवडीत धाडसी घरफोडी! हॉटेलच्या खोलीतून ६० हजारांचा मुद्देमाल लंपास; टीव्ही आणि दुचाकी चोरणारा अज्ञात चोरटा पोलिसांच्या रडारवर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**हिंजवडी :** आयटी पार्क आणि परिसरात चोऱ्यांचे सत्र सुरूच असून, आता हिंजवडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका धाडसी चोरीची घटना समोर आली आहे. चोरट्याने एका हॉटेलमधील भाड्याच्या खोलीला लक्ष्य करत तब्बल ६० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून पोबारा केला आहे. यामध्ये एक महागडा टीव्ही आणि मोटारसायकलचा समावेश आहे.

**रात्रीच्या अंधारात डल्ला; अशी घडली घटना**

ही घटना ५ जुलै २०२६ रोजी रात्री ७:०० वाजल्यापासून ते ६ जुलै २०२६ च्या पहाटे ४:१५ वाजण्याच्या सुमारास घडली. मौजे निंबोजे गावच्या हद्दीत असलेल्या 'हॉटेल शिवनेज' येथे फिर्यादी पवन




विष्णू दिवटे (वय २१ वर्षे, व्यवसाय- ड्रायव्हर, मूळ रा. सुनील कडू यांचे भाड्याचे रूम, कढवस्ती कुरूळी, ता. खेड, जि. पुणे) हे वास्तव्यास होते.

फिर्यादी पवन हे आपल्या खोलीत नसताना किंवा झोपेत असताना, अज्ञात चोरट्याने खोलीचा कडीकोंडा अथवा लॉक शिताफीने उघडून आत प्रवेश केला. चोरट्याने खोलीतील ६०,००० रुपये किमतीची टीव्ही (एस कंपनी) आणि खोलीबाहेर उभी असलेली एम.एच. १४ सी.एल. ०६८७ या क्रमांकाची 'रायडर' मोटरसायकल फिर्यादीच्या संमतीशिवाय, लबाडीच्या इराद्याने चोरून नेली.

**हिंजवडी पोलिसांत गुन्हा दाखल; तपास सुरू**

पहाटेच्या सुमारास चोरीचा हा प्रकार उघडकीस आल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. फिर्यादी पवन दिवटे यांनी तात्काळ हिंजवडी पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली. या तक्रारीवरून हिंजवडी पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम २८१, १२५(अ), १२५(बी) तसेच मोटर वाहन कायदा कलम १६४, १३४(ए)(बी), १७७, १८१, १९२/२ या कडक कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार विराजेदार अत्यंत वेगाने करत असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोरट्याचा माग काढला जात आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### राज्य ग्रा. पं. अधिकारी इंदापूर युनियनच्या नूतन कार्यकारिणीचा सन्मान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**इंदापूर :** राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ नवी दिल्लीचे अध्यक्ष, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते महाराष्ट्र राज्य ग्रा. पं. अधिकारी युनियन, जिल्हा शाखा पुणे यांच्या इंदापूर तालुका सन २०२६-२०३१ साठी निवड झालेल्या नूतन कार्यकारिणीचा इंदापूर येथील भाग्यश्री बंगलो येथे शुक्रवारी सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी हर्षवर्धन पाटील यांनी नवनिर्वाचित कार्यकारिणीचे अभिनंदन करीत ग्रामविकास अधिकारी हे त्रिस्तरीय स्थानिक स्वराज्य संस्थेतील प्रशासनाचा महत्त्वाचा आधारस्तंभ असल्याचे नमूद केले. शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचविण्यात त्यांची भूमिका मोलाची असल्याचे सांगितले. ग्रामीण भागाच्या विकासाला गती देण्यासाठी अधिकारी व गावोगावचे लोकप्रतिनिधी यांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन हर्षवर्धन पाटील यांनी याप्रसंगी बोलताना केले. तसेच याप्रसंगी नवनिर्वाचित अध्यक्ष निलकंठ गिरी यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, सर्व सहकाऱ्यांनी माझ्यावर दाखविलेल्या विश्वासाबद्दल सर्वांचे आभार मानतो व ग्रामविकास अधिकाऱ्यांच्या न्याय्य प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा करू. यावेळी ग्रा. पं. अधिकारी युनियनचे पदाधिकारी, ग्रामविकास अधिकारी उपस्थित होते. ‘‘इंदापूर ग्रा. पं.अधिकारी युनियन नूतन कार्यकारणी पुढीलप्रमाणे:- निलकंठ दत्तात्रय गिरी- (अध्यक्ष) स्वप्नील माणिक गायकवाड- (सचिव ) विठ्ठल नामदेव मरगळ- (उपाध्यक्ष) शैला गंगाराम आटोळे- (महिला उपाध्यक्ष) दादासाहेब बाळकृष्ण वाघ (कार्याध्यक्ष) महादेव शंकर नगरे (कोषा अध्यक्ष ) रवींद्र आनंता शेलार- (प्रसिद्धीप्रमुख) अमोल प्रकाश भोसले- सदस्य शोभा नारायण जाधव- सदस्य अंबिका अरविंद पावसे- सदस्य गणेश शिवाजी खरमाटे- सदस्य राजेंद्र पांडुरंग काळे- सदस्य

### दोन दुकाने फोडून ४१ हजारांची चोरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** दोन वेगवेगळ्या दुकानांचे शटर उचकटून चोरट्यांनी ४१ हजार रुपयांची रोकड चोरून नेली. ही घटना सोमवारी (६ जुलै) रात्री तीन वाजण्याच्या सुमारास मोशीत घडली. याप्रकरणी तिघांविरोधात भोसरी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी फिर्यादी यांच्या ट्रेडिंग कंपनी तसेच शेजारीच असलेल्या दूध डेअरी या दोन्ही दुकानांचे शटर कोणत्यातरी साधनांच्या साहाय्याने उचकटले.

# अतिवृष्टीमुळे संत ज्ञानेश्वर महाराज पालखी प्रस्थान सोहळा मर्यादित उपस्थितीत; आळंदीत न येण्याचे भाविकांना आवाहन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी :** महाराष्ट्रात सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी प्रस्थान सोहळा मर्यादित उपस्थितीत पार पाडण्याचा निर्णय आळंदी देवस्थान समितीने घेतला आहे. भाविक व वारकरी यांनी प्रस्थान सोहळ्यासाठी आळंदीत येऊ नये, तसेच पुण्यापासून पुढील टप्प्यात सोहळ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन देवस्थानतर्फे करण्यात आले आहे.

६ जुलै २०२६ पासून राज्यभर सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे आळंदी परिसरात इंद्रायणी नदीला महापूर आला आहे. नदीने धोक्याची पातळी ओलांडल्याने आळंदीतील तसेच इंद्रायणी नदीवरील सर्व वाहतूक बंद करण्यात आली आहे. पुराच्या पाण्यामुळे इंद्रायणी पुलावरील कठडे व विद्युत खांब वाहून गेले असून, आळंदी नगरपरिषदेचे वॉटरहाऊसही पाण्याखाली गेले आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे कठीण झाले आहे.

याशिवाय दर्शनबारी, मोबाईल स्वच्छतागृहे पुरात वाहून गेली असून, वीजपुरवठाही खंडित झाला आहे. तंबू व राहुट्यांच्या जागी चिखल झाल्यामुळे



वारकऱ्यांच्या निवासाची व्यवस्था करणे अशक्य असल्याचे देवस्थान समितीने स्पष्ट केले आहे.

या पार्श्वभूमीवर बुधवार, ८ जुलै २०२६ रोजी दुपारी २ वाजता संजीवन समाधी मंदिरात पालखी प्रस्थान सोहळा अत्यंत मर्यादित उपस्थितीत पार पडणार आहे.

सोहळ्यासाठी रथापुढील दिंडी क्रमांक १ ते २७ आणि रथामागील दिंडी क्रमांक १ ते २० मधील प्रत्येकी १० वारकरी, दिंडीप्रमुख, मानकरी, सेवेकरी तसेच नारळ प्रसादासाठी निमंत्रित सुमारे ५०० मान्यवर यांनाच प्रवेश दिला जाणार आहे. मानाचे खांदेकरी, कर्मचारी, आरोग्य व स्वच्छता विभागाचे कर्मचारी तसेच पोलीस यांच्यासह एकूण सुमारे १,६६० व्यक्तींच्या उपस्थितीत सोहळा पार पडणार आहे.

देवस्थान समितीने सर्व वारकरी व भाविकांना प्रस्थान सोहळ्यासाठी आळंदीत येऊ नये, असे आवाहन केले असून, पावसाची परिस्थिती लक्षात घेऊन पुढील मुक्कामापासून सोहळ्यात सहभागी होण्याबाबत नंतर माहिती देण्यात येईल, असे पालखी सोहळा प्रमुख ॲड. राजेंद्र बाबुराव उमाप यांनी सांगितले. प्रमुख विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे यांनीही लेखी निवेदनाद्वारे भाविक, वारकरी व नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करून आळंदीत गर्दी टाळावी आणि पुण्यापासून पुढील टप्प्यात पालखी सोहळ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.

## वाळूंजनगरमध्ये पुन्हा बिबट्याचा हल्ला; पाळीव कुत्रा ठार, ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** वाळूंजनगर (ता. आंबेगाव): वाळूंजनगर परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा वावर वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सोमवारी (दि. ६) दुपारी सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास बिबट्याने बाबाजी वाळूंज यांच्या पाळीव कुत्र्यावर हल्ला करून त्याला ठार केले. दिवसा घडलेल्या या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये पुन्हा एकदा भीतीचे वातावरण पसरले आहे.

दोन दिवसांपूर्वीच पोखरकर-पासूडीवस्ती परिसरात बारकू अनंथा ठोंबरे यांच्या मेंढीवर बिबट्याने हल्ला करून ती ठार केली होती. त्यानंतर आता पाळीव कुत्र्यावर झालेल्या हल्ल्यामुळे बिबट्याच्या वाढत्या वावराचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. सध्या पावसाळ्यामुळे शेतकरी शेतीच्या कामात व्यस्त असून, अशा परिस्थितीत बिबट्याच्या वावरामुळे शेतकरी व ग्रामस्थांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. त्यामुळे वनविभागाने तातडीने या परिसरात पिंजरा लावून बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी सरपंच तृप्ती महेंद्र वाळूंज, माजी सरपंच महेंद्र वाळूंज, माजी चेअरमन बाळासाहेब वाळूंज, दीपक वाळूंज तसेच माजी सरपंच जालिंदर वाळूंज यांनी केली आहे. परिसरात बिबट्याचे वारंवार दर्शन होत असतानाही वनविभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत असून, वनविभाग या गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष करत आहे का, असा सवालही नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

## लोणी येथील लंकेवस्ती येथे काकडीचे पीक जोमात; मात्र बाजारभाव कमी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** लोणी (ता. आंबेगाव): लोणी येथील लंकेवस्ती येथील प्रगतशील शेतकरी वसंत नाना लंके यांनी आपल्या १५ गुंठे क्षेत्रात काकडीची लागवड केली असून, सध्या काकडीचे पीक जोमात आले आहे. पीक तोंडणीस आले असल्याची माहिती त्यांनी दिली.

काकडीची लागवड केल्यानंतर साधारणपणे ४५ दिवसांनी पीक तोंडणीस येते. पीक चांगले असल्यास अंदाजे २० ते २२ तोडे मिळतात. मात्र लागवडीपासून तोंडणीपर्यंत आणि शेवटच्या तोड्यापर्यंत उत्पादनासाठी मोठा भांडवली खर्च करावा लागतो. त्यामुळे शेतकऱ्यांना उत्पादन खर्च परवडेल असा बाजारभाव मिळणे आवश्यक असल्याचे लंके यांनी सांगितले.

सध्या बाजारात १० किलो काकडीला १८० ते २०० रुपये दर मिळत असला, तरी हा दर उत्पादन खर्चाच्या तुलनेत अत्यंत कमी असल्याने काकडी उत्पादक शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.



## दूध भेसळीच्या पार्श्वभूमीवर मंचरच्या सन्मानासाठी सर्वपक्षीय आज रस्त्यावर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** पुणे ग्रामीण पोलीस आणि अन्न व औषध प्रशासन (एफडीए) यांच्या संयुक्त कारवाईत दूध भेसळ करणाऱ्या आंतरजिल्हा टोळीचा पर्दाफाश झाल्यानंतर आंबेगाव तालुक्यात संतापाची लाट उसळली आहे. या कारवाईत मंचरचा उल्लेख प्रमुख केंद्र म्हणून झाल्याने शहराच्या प्रतिष्ठेला धक्का बसल्याची भावना व्यक्त करत विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि नागरिकांनी एकजूट दाखवली आहे.

याच पार्श्वभूमीवर बुधवारी (८ जुलै) सकाळी ११ वाजता मंचरमध्ये सर्वपक्षीय निषेध मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चाद्वारे दूध भेसळ प्रकरणातील आरोपींना कठोरात कठोर शिक्षा देण्याबरोबरच



मंचरच्या नावाला गालबोट लावणाऱ्या प्रवृत्तींविरोधात शासनाने निर्णायक कारवाई करावी, अशी मागणी केली जाणार आहे.

बैठकीत वक्त्यांनी स्पष्ट केले की, व्यापारी, शैक्षणिक आणि कृषी क्षेत्रात मंचरने स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. काही मोजक्या भेसळखोरांच्या कृत्यामुळे संपूर्ण शहरावर संशयाची छाया पडणे दुर्दैवी असून अशा प्रवृत्तींना समाजात कोणतेही स्थान नसल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. दोषींना कायद्यानुसार कमाल शिक्षा व्हावी, अशी सर्वांची एकमुखी भूमिका होती.

यावेळी पुणे विभागाचे अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी राबविलेल्या धाडसी आणि प्रभावी कारवाईचे उपस्थितांनी विशेष स्वागत केले. जनतेच्या आरोग्याशी खेळणाऱ्या गुन्ह्यांविरोधातील त्यांच्या कठोर भूमिकेचे कौतुक करत आंबेगाव तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींकडून त्यांना लेखी समर्थन देण्याचा निर्णयही घेण्यात आला.

दूध भेसळीसारख्या गंभीर गुन्ह्यांविरोधात प्रशासनाने भविष्यातही अशाच धडक आणि सातत्यपूर्ण कारवाया सुरू ठेवाव्यात, अशी अपेक्षाही यावेळी व्यक्त करण्यात आली.

बैठकीस सुरेश भोर, राजाराम बाणखेले, देवदत्त निकम, देविदास दरेकर, नितीन भालेराव, सचिन बांगर, वसंत बाणखेले, अजित चव्हाण, प्रवीण थोरात, विजय पवार, वैभव पोखरकर, सुरेश निघोट, विशाल वाबळे, तेजस जाधव, निलेश वळसे, गणेश खानदेशे यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आंबेगावच्या आदिवासी भागातील धोकादायक गावांची पाहणी; नागरिकांना सुरक्षित स्थळी स्थलांतराचे आवाहन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील आदिवासी भागात गेल्या दोन दिवसांपासून अधूनमधून मुसळधार पाऊस सुरू असून, संभाव्य धोका लक्षात घेता प्रशासनाने डोंगराळ व धोकादायक भागातील गावांची पाहणी केली.

प्रशासकीय अधिकाऱ्यांनी पोखरी (बेंढारवाडी), जांभोरी येथील काळवाडी क्रमांक १ व २, माळीण (पसारवाडी), पंचाळे, अडीवरे आदी भागांना भेट देऊन स्थानिक शेतकरी व ग्रामस्थांशी संवाद साधला. हवामान विभागाने पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज वर्तविल्याने नागरिकांनी सतर्क राहावे आणि आवश्यकतेनुसार सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित होण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले.



डोंगराळ व अतिवृष्टीप्रवण भागातील वाडी-वस्त्यांच्या पुनर्वसनाचे काम शासनाच्या माध्यमातून सुरू असून, अनेक ठिकाणी घरकुलांना मंजुरी देण्यात आली आहे. तसेच काही ठिकाणी जागेचे सपाटीकरण आणि जोडरस्त्यांची कामे पूर्ण झाल्याची माहिती देण्यात आली.

राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री सौ. सुनेत्रावहिनी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच माजी सहकारमंत्री दिलीपराव वळसे पाटील यांच्या माध्यमातून आदिवासी भागातील धोकादायक व डोंगराळ वाड्यांचे पुनर्वसन प्रगतिपथावर असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या पाहणी दौऱ्यात आंबेगाव-जुन्नर उपविभागीय अधिकारी अर्चना तांबे, तहसीलदार सचिन वाघ, माजी सभापती प्रकाशराव घोलप, उपसभापती ज्योती पारधी, आंबेगाव पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी प्रमिला वाळुंज, आंबेगाव तालुका खरेदी-विक्री संघाचे उपाध्यक्ष शामराव बांबळे, माजी अध्यक्ष रमेशशेठ खिलारी, प्रविण पारधी, सार्वजनिक बांधकाम विभाग घोडेगावचे उपअभियंता कुंभार यांच्यासह स्थानिक पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

## मुसळधार पावसाने भीमाशंकरला निसर्गाचा जलाभिषेक; मंदिर परिसर जलमय पायरी मार्गावरून धबधब्यासारखा पाण्याचा प्रवाह; भाविकांना सावधगिरीचे आवाहन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भीमाशंकर :** पुणे जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाचा परिणाम बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या भीमाशंकर मंदिर परिसरात पाहायला मिळत आहे. अखंड कोसळणाऱ्या पावसामुळे मंदिराकडे जाणाऱ्या पायरी मार्गावरून मोठ्या वेगाने पाणी वाहू लागल्याने संपूर्ण परिसर जलमय झाला असून, मंदिराला जणू निसर्गानेच जलाभिषेक केल्याचे मनोहारी दृश्य निर्माण झाले आहे.

मंदिराच्या पायरी मार्गावरून धबधब्यासारखा पाण्याचा प्रवाह वाहत असल्याने भाविकांसह पर्यटकांचे लक्ष वेधून घेत आहे. मंदिराच्या बाहेरील परिसरात गुडघाभर पाणी साचल्याने काही काळ दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना अडचणींचा सामना करावा लागला. पावसामुळे परिसरातील वातावरण अधिक निसर्गरम्य झाले असले



तरी सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रशासनाने आणि देवस्थान समितीने सतर्कतेचे आवाहन केले आहे.

देवस्थान समितीचे अध्यक्ष ॲड. सुरेश कौदरे यांनी सांगितले की, पायऱ्यांवरून मोठ्या प्रमाणात पाणी वाहत असल्याने त्या अत्यंत घसरड्या झाल्या आहेत. त्यामुळे भाविकांनी दर्शनासाठी येताना विशेष काळजी घ्यावी. तसेच भीमाशंकर अभयारण्य आणि परिसरातील धबधब्यांमध्ये पाण्याचा प्रवाह अचानक वाढण्याची शक्यता असल्याने अशा ठिकाणी जाणे टाळावे, असे आवाहन त्यांनी केले.

दर्शनासाठी निघण्यापूर्वी स्थानिक हवामानाचा अंदाज तसेच प्रशासनाने जारी केलेल्या सूचना तपासाव्यात. निसर्गाचे हे देखणे रूप अनुभवताना स्वतः ची आणि कुटुंबीयांची सुरक्षितता सर्वोच्च प्राधान्याने जपावी, असेही त्यांनी नमूद केले.

## शस्त्र बाळगल्या प्रकरणी तरुणाला अटक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** गंभीर गुन्हा करण्याच्या उद्देशाने धारदार कोयता बाळगणाऱ्या एका तरुणाला पोलिसांनी अटक केली. ही कारवाई सोमवारी (६ जुलै) सायंकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास थेरगाव येथील काळेवाडी स्मशानभूमीजवळ घडली. पोलिस अंमलदार तुषार शते यांनी याप्रकरणी काळेवाडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. समीर शराफत उस्मानी (वय २०, चांदणी चौक, जगतापनगर जवळ, थेरगाव) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालय हद्दीत शस्त्रे बाळगण्यास बंदी आहे. बंदी आदेशाचे उल्लंघन करून आरोपी समीर हा आपल्या ताब्यात एक धारदार लोखंडी कोयता घेऊन काहीतरी गंभीर स्वरूपाचा गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरताना मिळून आला. गुन्हे शाखा युनिट-२ च्या पथकाने ही कारवाई केली असून काळेवाडी पोलिस तपास करीत आहेत.

## सारांश वृत्त

### पुणे जिल्ह्यातील ६० गावांचा संपर्क पूर्णपणे तुटला, हजारो लोक अडकले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पानशेत रस्त्यावरील वरदाडे येथील तात्पुरता रस्ता आणि पूल मुसळधार पावसामुळे आलेल्या पुरात वाहून गेला आहे. यामुळे राजगड, हवेली आणि मुळशी या तीन तालुक्यांतील तब्बल ६० हून अधिक गावांचा संपर्क पूर्णपणे तुटला आहे. यामुळे ६० गावातील हजारो नागरिक, नोकरदार आणि शेतकरी अडकून पडले आहेत', अशी माहिती खासदार सुप्रिया सुळेय यांनी दिली.

'सार्वजनिक वाहतूक, तसेच दूध, भाजीपाला आणि किराणा मालाची वाहतूक पूर्णपणे बंद झाली आहे. पानशेत, वरसगाव धरणांसह लष्कराचे केंद्र, शाळा, बँका आणि सरकारी कार्यालयांना याचा मोठा फटका बसला आहे. सध्या पर्यायी मार्ग म्हणून मालखेड-वसवेवाडी मार्गाचा वापर केला जात आहे, मात्र हा कच्चा, अरुंद रस्ता कमालीचा धोकादायक बनला आहे', अशी माहिती सुळे यांनी दिली आहे.

'रिंग रोडच्या कामासाठी जुना पूल पाडण्यात आला, पण त्यानंतर नागरिकांच्या सुरक्षेचा आणि पर्यायी मार्गाचा विचार गांभीर्याने केला गेला नाही, ही खेदाची बाब आहे.

जिल्हाधिकारी पुणे यांना विनंती आहे की कृपया वरदाडे येथील वाहून गेलेल्या पुलाची आणि रस्त्याची तातडीने युद्धपातळीवर दुरुस्ती करण्यात यावी. दळणवळणासाठी सुरक्षित व खात्रीशीर पर्यायी मार्ग त्वरित उपलब्ध करून द्यावा.तसेच या भागातील वीज, आरोग्य आणि इतर अत्यावश्यक सेवा खंडित होणार नाहीत याची काळजी घ्यावी', असे आवाहन सुप्रिया सुळे यांनी प्रशासनाला केले.

# मुंबईतील पूरस्थितीवर उच्च न्यायालयाची नाराजी; 'नाले अडवतो, जमिनी बळकावतो, ही परिस्थिती आपलीच निर्मिती'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** मुंबईतील पावसाळी पाणी साचण्याच्या समस्येवर बॉम्बे उच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त करत शहरातील पूरस्थिती ही केवळ नैसर्गिक आपत्ती नसून मानवी हस्तक्षेपामुळे निर्माण झालेली समस्या असल्याचे निरीक्षण नोंदवले आहे. नाल्यांवरील अतिक्रमणे, अनियोजित बांधकामे आणि नैसर्गिक जलवाहिन्यांमध्ये झालेला हस्तक्षेप यामुळे मुंबईच्या पावसाळी संकटात वाढ होत असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे.

मुंबईत दरवर्षी मुसळधार पावसानंतर निर्माण होणारी पाणी तुंबण्याची समस्या ही प्रशासनासमोरील मोठे आव्हान बनली आहे. या पार्श्वभूमीवर सुनावणीदरम्यान न्यायालयाने शहरातील जलनिचरा व्यवस्थेवर प्रश्न उपस्थित केले. पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी असलेल्या मार्गांवर अतिक्रमणे झाल्याने आणि नाल्यांची नैसर्गिक क्षमता कमी झाल्याने पाणी साचण्याच्या घटना वाढत असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

न्यायालयाने प्रशासनाच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित करत, केवळ पावसाला दोष देऊन चालणार नाही, असे सांगितले. शहराचा विस्तार करताना पर्यावरणीय बाबी, नैसर्गिक प्रवाह आणि जलव्यवस्थापनाकडे पुरेसे लक्ष दिले गेले नसल्याने आजची परिस्थिती निर्माण झाल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.




मुंबईतील मिठी नदीसह अनेक नाले, छोटे जलप्रवाह आणि पाणी साठवण क्षेत्रांवर झालेल्या मानवी हस्तक्षेपाचा परिणाम पावसाळ्यात दिसून येतो. विकासकामे आणि बांधकाम प्रकल्पांमुळे नैसर्गिक पाण्याच्या मार्गांमध्ये बदल झाल्याने शहराची पाणी सामावून घेण्याची क्षमता कमी झाल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

दरवर्षी पावसाळ्यापूर्वी मुंबई महापालिकेकडून नालेसफाई, पंपिंग स्टेशन आणि पाणी निचरा व्यवस्थेच्या तयारीचा दावा केला जातो. मात्र, प्रत्यक्षात अनेक भागांमध्ये काही तासांच्या पावसातच पाणी साचते. त्यामुळे नालेसफाईच्या गुणवत्तेपासून ते दीर्घकालीन नियोजनापर्यंत अनेक प्रश्न कायम आहेत.

उच्च न्यायालयाच्या निरीक्षणामुळे मुंबईच्या नागरी नियोजनातील त्रुटी पुन्हा चर्चेत आल्या आहेत. केवळ तात्पुरत्या उपाययोजनांऐवजी अतिक्रमण नियंत्रण, जलवाहिन्यांचे संरक्षण, शास्त्रीय पद्धतीने शहर नियोजन आणि हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर दीर्घकालीन धोरण आखण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

मुंबईसारख्या वेगाने वाढणाऱ्या महानगरासाठी विकास आणि पर्यावरण यांचा समतोल राखणे अत्यावश्यक आहे. अन्यथा दरवर्षीच्या पावसाळ्यातील पूरस्थिती ही केवळ हवामानाची समस्या न राहता नियोजनातील अपयशाचे प्रतिबिंब ठरण्याची शक्यता आहे.

## स्मार्ट मीटरने जनता त्रस्त, लाखांच्या बिलाने भुर्दंड, सरकारने लक्ष द्यावे; विधानसभेत विजय वडेट्टीवार यांची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** विधानसभेत काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी राज्यातील विविध गंभीर प्रश्न उपस्थित केले. विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती, मुंबई महापालिकेच्या आर्थिक स्थितीपासून ते मुद्रांक शुल्क घोटाळा, स्मार्ट मीटर, शासकीय जमिनींची लूट, डव्अ आणि अचळगढ योजनेतील कथित अनियमितता अशा अनेक विषयांवरून टीका केली.

ब्रह्मपुरीला स्वतंत्र जिल्ह्याचा दर्जा देण्याबाबत सकारात्मक प्रस्ताव आले आहेत,त्यामुळे जिल्हा निर्मितीचा प्रस्ताव आल्यास त्यावेळी ब्रह्मपुरीचा सकारात्मक विचार करावा. तसेच एकीकडे सरकार सांगते की स्मार्ट मीटर ही जबरदस्ती बसवण्यात येणार नाही. पण अनेक ठिकाणी जबरदस्ती मीटर बसवण्यात आले. त्यानंतर वीजबिले प्रचंड वाढल्याच्या तक्रारी राज्यभरातून येत आहेत. वाढलेल्या बिलांमुळे जनता त्रस्त आहे, सरकारने याकडे लक्ष द्यावे अशी मागणी त्यांनी केली.

**हा पैसा नेमका कुठे खर्च झाला?**

मुंबई महापालिकेच्या मुदत ठेवींमध्ये एका वर्षात सुमारे ४ हजार कोटी रुपयांची घट झाल्याचा मुद्दा उपस्थित करत हा पैसा नेमका कुठे खर्च झाला? मुंबईत पहिल्याच पावसात अनेक मृत्यू, मॅनहोल दुर्घटना, झाडे पडण्याच्या घटना घडत असताना एवढा निधी खर्च होऊनही नागरिकांना सुविधा का मिळत नाहीत, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

## परदेशातून कचरा आयात करणे म्हणजे भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान : मद्रास उच्च न्यायालय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेन्नई :** परदेशातून जाणूनबुजून महानगरपालिका घनकचरा भारतात आयात करणे हा केवळ पर्यावरणविषयक कायद्यांचा भंग नसून भारताच्या सार्वभौमत्वाला थेट आव्हान देणारा गंभीर प्रकार असल्याचे महत्त्वपूर्ण निरीक्षण मद्रास उच्च न्यायालयाने नोंदवले आहे.

न्यायमूर्ती डी. भरत चक्रवर्ती यांनी सुनावणीदरम्यान, भारतमातेवर जाणीवपूर्वक कचरा टाकणे हा केवळ पर्यावरण संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा नसून, तो देशाच्या सार्वभौमत्वावर आघात करणारा प्रकार आहे. यापेक्षा गंभीर 'देशद्रोह' असू शकत नाही, असे निरीक्षण व्यक्त केले.

ही सुनावणी अशा याचिकांवर झाली होती, ज्यामध्ये आयातदारांनी 'वेस्ट पेपर' म्हणून जाहीर केलेल्या मालामध्ये प्रत्यक्षात प्लास्टिकच्या बाटल्या, अन्नाचा कचरा, रस्ते झाडल्याचा कचरा, तुटलेला काच आणि इतर महानगरपालिका घनकचरा आढळला होता.

न्यायालयाने संबंधित आयातदारांच्या याचिका फेटाळून लावत हा कचरा भारतात विल्हेवाट न लावता तो मूळ देशात परत पाठवण्याचे निर्देश दिले. तसेच, आयातदारांवर डिटेन्शन व डेमरेज शुल्कासह अन्य आर्थिक जबाबदाऱ्या टाकण्यात आल्या असून, निर्धारित मुदतीत कचरा परत न पाठवल्यास पर्यावरणीय नुकसानभरपाई आकारण्याचेही निर्देश देण्यात आले. न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की, प्रकरणातील तथ्यांनुसार आवश्यक असल्यास भारतीय न्याय संहिता **(BNS)**, २०२३ मधील कलम १५२ (देशाच्या सार्वभौमत्व, एकात्मता आणि अखंडतेला धोका निर्माण करणारी कृत्ये) लागू होण्याचा प्रश्नही विचारात येऊ शकतो.

## अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या कर्ज प्रक्रियेत पतसंस्थांचा समावेश? प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या कर्जवाटप प्रक्रियेत सक्षम पतसंस्थांचा समावेश करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. ग्रामीण भागातील युवकांना उद्योगासाठी अर्थसहाय्य अधिक सुलभतेने उपलब्ध करून देण्यासाठी पतसंस्थांना कर्ज प्रक्रियेत सहभागी करून घेण्याबाबत सर्वसमावेशक प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिले आहेत.

मंत्रालयात डॉ. पंकज भोयर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या माध्यमातून मराठा समाजातील तरुणांना उद्योगासाठी दिल्या जाणाऱ्या अर्थसहाय्याची प्रक्रिया अधिक सुलभ करण्यावर चर्चा झाली. सध्या ही प्रक्रिया बँकांमार्फत राबविली जाते. मात्र, ग्रामीण भागात मजबूत जाळे असलेल्या पतसंस्थांचा




समावेश केल्यास लाभार्थ्यांना कर्ज मिळण्याची प्रक्रिया अधिक गतिमान होऊ शकते, असा मुद्दा बैठकीत मांडण्यात आला.

बैठकीस महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, दक्षिण कराडचे आमदार डॉ. अतुलबाबा भोसले, सहकार विभागाचे वरिष्ठ अधिकारी, सहकार आयुक्त व निबंधक कार्यालयाचे प्रतिनिधी तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

डॉ. भोयर यांनी सांगितले की, महामंडळाच्या योजनांमध्ये सहभागी होणाऱ्या पतसंस्थांसाठी आर्थिक क्षमता, पारदर्शक व्यवहार, कर्ज व्यवस्थापन आणि आर्थिक शिस्त यासारखे स्पष्ट निकष निश्चित करणे आवश्यक आहे. सक्षम व विश्वासार्ह पतसंस्थांची निवड करून त्यांच्यामार्फत कर्जवाटप केल्यास ग्रामीण भागातील तरुणांना उद्योग उभारणीसाठी आवश्यक निधी वेळेत उपलब्ध होण्यास मदत होईल.

महामंडळाच्या कर्ज योजनांसाठी पतसंस्थांचे आर्थिक निकष निश्चित करून विस्तृत प्रस्ताव प्राधान्याने सादर करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

दरम्यान, या निर्णयामुळे सहकारी पतसंस्थांना नव्या जबाबदारीची संधी मिळणार असली तरी कर्जवाटप प्रक्रियेत पारदर्शकता, लाभार्थ्यांची निवड आणि परतफेड व्यवस्थेवर विशेष लक्ष ठेवावे लागणार आहे. सक्षम पतसंस्थांच्या सहभागामुळे युवकांच्या उद्योगांना चालना मिळून रोजगार निर्मितीला हातभार लागण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## राम मंदिर देणगी प्रकरण : ४५ दिवसांत ७० 'चोऱ्या'; एसआयटी तपासात सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटी उघड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लखनऊ :** अयोध्येतील श्रीराम मंदिराशी संबंधित देणगी आणि साहित्य व्यवस्थापनाच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या तपासात सुरक्षा व्यवस्थेतील गंभीर त्रुटी समोर आल्याचा दावा विशेष तपास पथकाने (एसआयटी) केला आहे. मंदिर परिसर आणि संबंधित व्यवस्थेत अवघ्या ४५ दिवसांच्या कालावधीत ७० चोरीसदृश घटना नोंदवल्याचे तपासात आढळून आले आहे. या घटनांमुळे सुरक्षेची यंत्रणा, नोंद व्यवस्थापन आणि देखरेखीच्या पद्धतींवर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

एसआयटीच्या प्राथमिक निष्कर्षांनुसार, अनेक ठिकाणी सीसीटीव्ही निरीक्षणातील त्रुटी, सुरक्षेतील कमतरता आणि वस्तूंच्या नोंदी ठेवण्याच्या प्रक्रियेतील गोंधळामुळे अनियमितता वाढल्याचे आढळले आहे. मंदिराशी संबंधित देणग्या, साहित्य आणि व्यवस्थापनाच्या प्रक्रियेत अधिक काटेकोर नियंत्रण यंत्रणा आवश्यक असल्याचे तपासातून समोर आले आहे.

तपासातील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे चोरीच्या घटनांची नोंद आणि प्रत्यक्ष नुकसान यामध्ये विसंगती आढळल्याचे सांगण्यात येत आहे. काही प्रकरणांमध्ये वस्तूंची मोजदाद, नोंदणी आणि पडताळणी प्रक्रिया पुरेशी प्रभावी नसल्यामुळे गैरप्रकार ओळखण्यात अडचणी आल्या.

एसआयटीने सीसीटीव्ही यंत्रणेच्या कार्यक्षमतेवरही प्रश्न उपस्थित केले आहेत. महत्त्वाच्या भागांमध्ये सातत्याने देखरेख नसणे, काही ठिकाणी अपुऱ्या



कॅमेऱ्यांची व्यवस्था आणि फुटेजच्या व्यवस्थापनातील त्रुटी यामुळे तपास प्रक्रियेला अडथळे निर्माण झाल्याचे निरीक्षण करण्यात आले आहे.

राम मंदिर हे देशातील कोट्यवधी भाविकांच्या श्रद्धेचे केंद्र असल्याने येथील आर्थिक व्यवहार आणि सुरक्षा व्यवस्था अत्यंत संवेदनशील मानली जाते.

देणगी व्यवस्थापनातील कोणतीही त्रुटी केवळ आर्थिक बाब नसून संस्थेच्या विश्वासार्हतेशी जोडलेली असल्याने पारदर्शक यंत्रणा उभारण्याची गरज अधोरेखित झाली आहे. दरम्यान, तपास यंत्रणेकडून संबंधित कर्मचारी, सुरक्षा व्यवस्था आणि व्यवस्थापन प्रक्रियेतील जबाबदाऱ्यांचा आढावा घेतला जात आहे. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी डिजिटल नोंद प्रणाली, मजबूत सीसीटीव्ही नेटवर्क आणि नियमित लेखापरीक्षण यांसारख्या उपाययोजनांची आवश्यकता असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. या प्रकरणामुळे मोठ्या धार्मिक संस्थांमधील देणगी व्यवस्थापन आणि सुरक्षेच्या मानकांवर पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. एसआयटीचा अंतिम अहवाल आल्यानंतर दोषी व्यक्ती किंवा व्यवस्थात्मक त्रुटींवर कोणती कारवाई केली जाते, याकडे लक्ष लागले आहे.

# विरोधाच्या पार्श्वभूमीवर पेट्रोलमधील २५ टक्के इथेनॉल मिश्रणाचा निर्णय लांबणीवर?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पेट्रोलमध्ये २५ टक्के इथेनॉल मिश्रण (E25) लागू करण्याच्या केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी योजनेला उद्योग क्षेत्र, वाहन वापरकर्ते आणि काही तज्ज्ञांकडून होत असलेल्या विरोधाच्या पार्श्वभूमीवर या निर्णयाच्या अंमलबजावणीला विलंब होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. इथेनॉल मिश्रण वाढवून आयातित कच्च्या तेलावरील अवलंबित्व कमी करण्याचे सरकारचे उद्दिष्ट असले, तरी त्याच्या तांत्रिक, आर्थिक आणि पर्यावरणीय परिणामांवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

केंद्र सरकारने पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रणाचे प्रमाण टप्प्याटप्प्याने वाढवण्याचे धोरण स्वीकारले आहे. सध्या देशात २० टक्के इथेनॉल मिश्रणाचे उद्दिष्ट गाठण्याच्या दिशेने काम सुरू आहे. त्यानंतर २५ टक्के मिश्रणाकडे वाटचाल करण्याचे नियोजन होते. मात्र, वाहन उद्योगातील काही घटकांनी अधिक प्रमाणातील इथेनॉल मिश्रणामुळे जुन्या वाहनांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली आहे.

इथेनॉल हे प्रामुख्याने ऊस, मका आणि इतर कृषी उत्पादनांपासून तयार केले जाते. सरकारच्या मते, इथेनॉल मिश्रणामुळे कच्च्या तेलाची आयात कमी होईल, शेतकऱ्यांना अतिरिक्त बाजारपेठ उपलब्ध होईल आणि प्रदूषण कमी करण्यास मदत होईल. मात्र, समीक्षकांच्या मते, इथेनॉल उत्पादनासाठी मोठ्या प्रमाणावर पाण्याची गरज असते. त्यामुळे पाणीटंचाई असलेल्या भागांमध्ये ऊसासारख्या पिकांवर आधारित इथेनॉल धोरणाचा पुनर्विचार करण्याची गरज आहे.

वाहन क्षेत्रातील तज्ज्ञांनीही ए२५ मिश्रणाबाबत सावध भूमिका घेतली आहे. जास्त प्रमाणातील इथेनॉलमुळे काही वाहनांच्या इंजिन भागांवर परिणाम होऊ शकतो, इंधन कार्यक्षमतेत बदल होऊ शकतो आणि वाहन कंपन्यांना तांत्रिक सुधारणा कराव्या लागू शकतात, अशी चिंता व्यक्त केली जात आहे. विशेषतः देशातील मोठ्या प्रमाणातील जुन्या वाहनांसाठी हे आव्हान ठरू शकते.




दुसरीकडे, पेट्रोलियम क्षेत्रातील कंपन्या आणि सरकारसमोर इथेनॉल उपलब्धतेचा प्रश्नही महत्त्वाचा आहे. वाढत्या मिश्रणासाठी सातत्यपूर्ण पुरवठा आवश्यक आहे. उत्पादन क्षमता, साठवणूक, वाहतूक व्यवस्था आणि कच्च्या मालाची उपलब्धता या सर्व बाबींचे नियोजन करावे लागणार आहे.

इथेनॉल मिश्रण धोरणाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्याचा इंधनाच्या किमतींवर होणारा परिणाम. सरकार या धोरणातून परकीय चलनाची बचत आणि ऊर्जा सुरक्षेचा दावा करत असले, तरी प्रत्यक्षात ग्राहकांना याचा कितपत फायदा होईल, याबाबत स्पष्टता आवश्यक आहे. इथेनॉल मिश्रण वाढल्यानंतर पेट्रोलच्या वापरात होणारे बदल आणि वाहनांच्या देखभाल खर्चाचा परिणाम ग्राहकांवर पडण्याची शक्यता आहे.

या पार्श्वभूमीवर सरकारकडून २५ टक्के इथेनॉल मिश्रणाची मुदत पुढे ढकलण्याचा विचार सुरू असल्याचे संकेत मिळत आहेत. धोरणात्मक उद्दिष्टे आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीतील अडचणी यामध्ये समतोल साधण्याचे आव्हान सरकारसमोर आहे.

ऊर्जा सुरक्षेसाठी पर्यायी इंधनांचा वापर वाढवणे आवश्यक असले तरी, त्यासाठी वाहन उद्योग, शेतकरी, ग्राहक आणि पर्यावरण या सर्व घटकांचा विचार करून धोरण आखणे गरजेचे आहे. इथेनॉल मिश्रणाचा वेग वाढवण्याऐवजी त्याची तयारी, तांत्रिक क्षमता आणि परिणामांचा अभ्यास करून पुढील निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे.